## ।। अथ श्रीसाईसच्चरित ।। अध्याय ४९ वा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।। श्रीकुलदेवतायै नमः ।। श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।। श्रीसद्‌गुरुसाईनाथाय नमः ।। सांङ्‌गोपांङ् सद्‌गुरु स्तवणें। ठकले वेद आणि पुराणें। तेथें मी अजाण नेणतेपणें। बरें राहणें निवांत ।।१।। खरें पाहतां धरावें मौन। हेंच कीं वस्तुतः सद्‌गुरुस्तवन। परि साईंचे एकेक गुण। पाडिती विस्मरण मौनाचें ।।२।। धन्य साईंची अगाध लीला। पाहतां निवांत राहवें न मजला। पक्वान्न गोड लागतां जिव्हेला। मनीं आठवला श्रोतृवृंद ।।३।। तयांसीही पंक्तीस घ्यावें। जेणें निजरसानंद दुणावे। ऐसें माझिया घेतलें जीवें। तेणें ही रससोये निडारली ।।४।। मोठें गोड खरें पक्वान्न। पंक्तीं नसतां स्नेही सज्जन। नावडे तें एकट्यालागून। फिकें गोडपण तयाचें ।।५।। साई सकळअवाप्तकाम। साई सकळसंतललाम। साई निजभक्त-विश्रामधाम। दुर्धरभवभ्रमनिवारक ।।६।। अनिर्वाच्य तयाची लीला। वर्णवेना मग वाणीला। अतर्क्याची अतर्क्य कला। केवीं मजला आकळेल ।।७।। कल्याणाचें जें कल्याण। तो हा साई निजकृपें जाण। देई निजकथेचें स्मरण। ग्रंथ हा परिपूर्ण करावया ।।८।। गाऊं जातां अगाध महिमान। समर्थ कोण कराया कथन। परा जेथें निघे परतोन। पश्यंती मध्यमा कोण कथा ।।९।। तिघी जेथें नुघडती वदन। चौथी वैखरी तेथें कोण। हें मी जाणे जरी संपूर्ण। तरी हें मन राहीना ।।१०।। सद्‌गुरुचे पायीं न विनटतां। यथार्थ स्वरूप येईना हातां। संत श्रीहरिस्वरूप स्वतः। कृपाहस्ता प्रार्थावें ।।११।। गुरुचरणाची आवडी। हेचि आपुली सर्वस्वजोडी। संतसहवासाची गोडी। प्रेमपरवडी लागो आम्हां ।।१२।। जया पूर्ण देहाभिमान। तया न साजे 'भक्त' अभिधान। स्वयें जो पूर्ण निरभिमान। खरें भक्तपण त्याअंगीं ।।१३।। जया ज्ञातृत्वाचा ताठा। श्रेष्ठत्वाचा अभिमान लाठा। केवळ दंभाचा जो वसवटा। तयाची प्रतिष्ठा ती काय ।।१४।। आपुल्याच गुरुची कीर्ती। अभागी जे प्रेमें न गाती। बधिर नसूनि जे नायकती। ते मंदमती मूर्तिमंत ।।१५।। तीर्थ व्रत यज्ञ दान। यांहूनि थोर तपाचरण। त्यांहूनि अधिक हरिभजन। निजगुरुध्यान सर्वाधिक ।।१६।। साईच त्याचिया भक्तांचें ध्यान। साईच त्यांचें देवदेवतार्चन। साईच त्यांचें गुप्तनिधान। रक्षावें परी अकृपणत्वें ।।१७।। यदा कदा येई मज आळस। परि न अंतर्यामीं साईंस। विसर पडतां कथानकास। देई मज वेळेस आठवण ।।१८।। बसूं म्हणतां क्षण निवांत। माझें कांहीं न चले तेथ। कथा ऐसी स्फुरे अकल्पित। लेखणी हातांत घेणें पडे ।।१९।। ऐसिया त्याच्या अगाध कथा। ऐकवावया त्या निजभक्तां। आणिक माझिया निजस्वार्था। मज या सच्चरिता प्रवर्तविलें ।।२०।। नाहींतरी संताचिया कथा। ज्याचा तोच रचिता लिहिता। तयाची ती स्फूर्ती नसतां। केवळ नीरसता पदोपदीं ।।२१।। असो कृपाळू साईनाथ। प्रवेशूनि मन्मनाआंत। करवूनि घेतला आपुला ग्रंथ। माझेही मनोरथ पुरविले ।।२२।। मुखीं श्रीसाईनामावर्तन। चित्तीं तयाचें वचनचिंतन। मनीं तयाचे मूर्तीचें ध्यान। पूर्ण समाधान येणें मज ।।२३।। वदनीं श्रीसाईंचें नाम। अंतरीं श्रीसाईंचें प्रेम। ज्याचें साईप्रीत्यर्थ कर्म। ॠणाईत परम त्या साई ।।२४।। तुटावया संसारबंधन। याहूनि नाहीं अन्य साधन। साईकथा परम पावन। सदा सेवन सुखदायी ।।२५।। पायीं साईसी प्रदक्षिण। करा श्रवणीं सच्चरितश्रवण। सर्वांगीं द्या प्रेमालिंगन। डोळां घ्या दर्शन साईंचें ।।२६।। साष्टांगीं यावें लोटांगणीं। मस्तक ठेवावें तया चरणीं। जिव्हा लावावी तन्नामस्मरणीं। नासिकें अवघ्राणीं निर्माल्य ।।२७।। आतां पूर्वकथानुसंधान। गताध्यायीं श्रोतयांलागून। चमत्कारप्रिय भक्तकथाकथन। कथीन हें वचन दिधलें ।।२८।। स्वयें न स्वार्थ-परमार्थपरायण। नसतां संतांचे अधिकाराची जाण। केलिया कोणीं तयांचें वर्णन। अविश्वासी मन जयाचें ।।२९।। स्नेही कथितां साईंच्या गोष्टी। ऐके परी तो दोषैकदृष्टी। तया न मिळतां स्वानुभवपुष्टी। कांहीं न सृष्टींत मानी तो ।।३०।। हरी कानोबा नामाभिधान।

स्नेह्यांसवें मुंबईहून। करावया साईंचें परीक्षण। निघाले पर्यटण करावया।।३१।। परि साईंची कलाकुसरी। प्रकाशे जो सकळांतरीं। तें लाघव ती नवलपरी। कोण निर्धारीं जाणील।।३२।। हरीभाऊ शिर्डीस निघतां। कारण कळलें साईसमर्था। केवळ चमत्काराचा भोक्ता। तितुकीच पात्रता तयाची।।३३।। तितुकीच तया दावी चुणूक। घेई आपुलासा करूनि निष्टंक। तयाच्याही श्रमाचें सार्थक। युक्तिप्रयोजक संत खरे।।३४।। कोपरगांवीं स्नेहीसमेत। हरीभाऊ बैसले टांग्यांत। गोदावरींत होऊनि सुस्नात। निघाले शिर्डीप्रत अविलंबें।।३५।। येतांच कोपरगांवाहून। हस्तपाद प्रक्षाळून। हरीभाऊ संतावलोकन। करावया जाण निघाले।।३६।। पायीं कोरें पादत्राण। माथां जरीचा फेटा बांधून। साईबाबांचें घ्यावया दर्शन। उत्कंठितमन हरीभाऊ।।३७।। मग ते येतां मशिदीसी। दूरूनि देखूनियां साईंसी। वाटलें सन्निध जाऊनि त्यांसी। लोटांगणेंसीं वंदावें।।३८।। परि पादत्राणांची अडचण। ठेवावया न निर्भयस्थान। तेथेंचि एक कोपरा पाहून। त्यांतचि तीं सारून ठेवियलीं।।३९।। मग ते वरती दर्शना गेले। प्रेमें साईंचे चरणां वंदिलें। उदीप्रसाद घेऊनि परतले। वाड्यांत निघाले जावया।।४०।। पायीं घालूं जातां पायतण। मिळेना पाहतां शोधशोधून। परतले अनवाणी खिन्नवदन। आशा ते सांडून समूळ।।४१।। कारण तेथें मंडळी फार। येती जाती वारंवार। पुसावें तरी कोणास साचार। कांहींही विचार सुचेना।।४२।। ऐसें तयांचें दुश्चित मन। डोळियांपुढें पादत्राण। चित्तास पादत्राणचिंतन। सर्वानुसंधान पादत्राण।।४३।। हौसेसारिखें विकत घेतलें। पादत्राण गेलें हरवलें। अर्थात् कोण्या चोरानें चोरिले। निश्चयें वाटलें तयांस।।४४।। असो पुढें केलें स्नान। पूजा नैवेद्यादि सारून। पंक्तीस बैसूनि केलें भोजन। परि न समाधान चित्तास।।४५।। सभामंडप साईंचें स्थान। तेथूनि साईंची दृष्टी चुकवून। कोणी न्यावें माझें पायतण। आश्चर्य लहान हें काय ?।।४६।। लागली तयां हुरहूर। चित्त नाहीं अन्नपानावर। मंडळीसमवेत आले बाहेर। आंचवूं कर धुवावया।।४७।। इतुक्यांत एक मुलगा मराठा। हरवल्या पादत्राणाचा बाहुटा। लावूनि एका काठीचे शेवटा। पातला त्या ठायां अवचित।।४८।। मंडळी जेवूनि आंचवीत। मुलगा आला शोध करीत। म्हणे बाबा मज पाठवीत। काठी ही हातांत देऊनि।।४९।। ''हरी का बेटा जरी का फेटा।'' ऐसा पुकार करीत जा बेटा। ''याच त्या माझ्या'' ऐशिया उत्कंठा। झोंबेल त्या देऊनि टाकाव्या।।५०।। परि जो आहे हरी मा बेटा। आहे तयाचा जरीचा फेटा। आधीं हें निश्चित झालिया शेवटा। द्याव्या न बोभाटा करावा।।५१।। येतां ऐसा पुकार कानीं। ओळखोनि त्या वहाणा नयनीं। हरीभाऊ गेले धांवूनि। साश्चर्य मनीं जाहले।।५२।। आनंदाश्रू आले डोळां। हरीभाऊंस गहिंवर दाटला। देखूनि गेलेल्या पायतणाला। चमत्कारला अत्यंत।।५३।। म्हणती मुलास ये ये इकडे। पाहूं दे आण वहाणा मजकडे। पाहूनि वदे या तुज कोणीकडे। गिवसल्या रोकडें मज सांग।।५४।। मुलगा म्हणे तें मी नेणें। मजला बाबांची आज्ञा मानणें। 'हरी का बेटा' असेल तेणें। जरीचा फेटा दावणें मज।।५५।। तयासचि मी देईन वहाणा। मज इतराची ओळख पटेना। पटवील जो या बाबांच्या खुणा। तोच या वहाणा घेईल।।५६।। ''अरे पोरा त्या माझ्याच वहाणा।'' हरीभाऊ म्हणतां देईना। मग तो सकळ बाबांचिया खुणा। पटवी मना पोराच्या।।५७।। म्हणे पोरा मींच रे हरी कान्होबाचा बेटा ही वैखरी । सर्वथैव आहे कीं खरी । मज सर्वतोपरी लागतसे ।।५८।। आतां पाहीं फेटा जरीचा। फिटेल तुझे संशय मनींचा। मग मी ठरेन धनी वहाणांचा। दावा न इतरांचा यावरी।।५९।। झाली तेव्हां मुलाची समजूत। वहाणा दिधल्या हरीभाऊप्रत। पुरले तयाचे मनोरथ। साई हे संत अनुभविले।।६०।। आहे माझा फेटा जरी। ही काय मोठी नवलपरी। तो तों माझिये मस्तकावरी। सर्वतोपरी दृश्यमान।।६१।। परि मी असतां देशांतरीं। शिर्डीस माझी पहिलीच फेरी। साईबाबांस कैसियेपरी। मन्नाम हरी ठाऊक।।६२।। कान्होबा हा माझा पिता। कोणीं पाहिला सवरला नसतां। ''का'' या नामें तया उपलक्षितां। अतिआश्चर्यता वाटली।।६३।। पूर्वी साईसंतमहत्ता। माझे स्नेही मजला सांगतां। अवमानिली मी